# राजकीय क्षेत्रातीलउच्चपदस्थांचा भ्रष्टाचार व तत्कालीन सरकारची भूमिका

प्रतिभा टावरी राज्यशास्त्र विभाग प्रमुख , जी. एस महाविदयालय, खामगांव

---

**प्रस्तावणा -** 'जोपर्यंत आपण उच्च पातळंयावर चाललेल्या प्रच्छन्न भ्रष्टाचाराचा समुळ नाश करत नाही किंवा वशिलेबाजी, नातलगांना व आपल्याला अधिक जवळ असणाऱ्यांना पाठीशी घालुन त्यांच्याच हिताला प्राधान्य देणाऱ्या आपल्यांतील प्रवृतींची पाळेमुळे खणून काढत नाही तोपर्यन्त आपला देश या जगाच्या पाठीवर कदापिही मानाचे स्थान प्राप्त करु शकणर नाही.'[१] स्वातंत्र्यसंध्यासमयी (१४ ऑग १९४७) डॉ. सर्वपल्ली राधकृष्णन यांनी व्यक्त केलेले विचार

'सत्ता माणसाला भ्रष्ट करते. सत्तेच्या मिजाशीत, वैभवात, डामडौलात - त्या जाळयात बिल्कूल फसवले जाऊ नये म्हणून दक्ष राहा'[२] - स्वातंत्र्यदिनी (१५ ऑग १९४७) महात्मा गांधी यांनी व्यक्त केलेले विचार वरील वक्तव्यातुन 'सत्ता आणि भ्रष्टाचार' यांच्या धोक्यापासून सावध राहण्याचा इशारा डॉ. सर्वपल्ली राधकृष्णन व म. गांधीनी दिला होता. सार्वजनिक जीवनातील प्रामाणिकतेला सर्वाच्च प्राधान्य देणारे राज्यकर्ते, नीतीमान राजकारण व उत्तम प्रशासन हया बाबी लोकशाही मार्ग स्वीकारणाऱ्या सर्व विकासित देशाचे प्राथमिक उद्दिष्ट असले पाहिजे. या उद्दिष्टपूर्तीच्या आड येणऱ्या सर्व गोष्टीचा तीव्र प्रतिकार व्हायला पाहिजे. भ्रष्टाचार,लाचलुचत, गुन्हेगारी यासारख्या अपप्रवृत्तींना राजकारणात अजिबात स्थान नको. देशाच्या, प्रगतीला, भरभराटीला, लोकशाही मुल्यांच्या स्थापनेला हया अपप्रवृत्ती मारक ठरतात. याचा अनुभव भारत घेत आहे. स्वांतत्र्योत्तर काळातील सरकारे हया अपप्रवृत्तींचा राजकारण व प्रशासनातील शीरकाव रोखवण्यास कमी पडली. परिणामतः देशात सर्वव्यापी भ्रष्टाचार फैलला. राजकीय, प्रशासकीय, आर्थिक, सामाजिक, शैक्षणीक, धार्मिक सर्वच क्षेत्र भ्रष्टाचारग्रस्त झाली आहेत. राजकीय क्षेत्रात तर भ्रष्टाचाराने उच्चांक गाठला. ग्रामपंचायत सदस्यापासुन तर आमदार, खासदार, मंत्री, मुख्यमंत्री, प्रधानमंत्री यांची भ्रष्टाचाराची प्रकरणे देशाला काळीमा फासणारी आहे. भारतीय जनतेची फसवणूक करणारी आहे. उच्चपदस्थांच्या पातळीवरचा भ्रष्टाचार घोर काळजीचा विषय आहे. उच्चपदस्थांच्या भ्रष्टाचारांनी एवढी कमाल मर्यादा गाठली आहे की 'ट्रान्सपरन्सी इन्टरनॅशनल' २०१० च्या अहवालात भारताचा कंमाक ८७ वा दर्शविला आहे. याशिवाय शून्य (सर्वात भ्रष्ट) ते दहा (अत्यंत स्वच्छ) असा स्वच्छतेचा निर्देशांक असताना, त्यात भारताचा क्रंमाक ३.३ हा दर्शविला आहे. पंतप्रधान पं. नेहरु सरकार पासुन तर पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग सरकार पर्यन्तच्या कारकिर्दीत उच्चपदस्थांच्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणाची अखंड शृंखलाच निर्माण झाली आहे. प्रस्तुत शोध निबंधात केन्द्रीय सरकारात उच्च पद भूषविणाऱ्या नेत्यांची भ्रष्टाचाराच्या प्रकरणाची चर्चा केली आहे.

**शोधनिबंधाचे उद्दीष्ट -**

१. स्वातंत्र्योत्तर भारतातील उच्चपदस्थ पातळीवरील भ्रष्टाचाराच्या स्वरुपाचे विवेचन करणे.

२. तत्कालीन सरकारानीं भ्रष्टाचाराची प्रकरणे कशी हाताळली ? कोणती भूमिका घेतली ? याची चर्चा करणे.

३. उच्चपदस्थ पातळीवरील भ्रष्टाचाराला रोखण्यासाठी शिफारशी सुचविणे.

**गृहीत कृत्ये -**

१. स्वातंत्र्य प्राप्तीपासुन आजपर्यन्त उच्चपदस्थ पातळीवरील अनेक भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस येत आहे.

२. तत्कालीन सरकारे उच्चपदस्थ पातळीवर होणारे भ्रष्टाचार थांबवू शकली नाही.

३. पंतप्रधान लाल बहादुर शास्त्रीनीं उच्चपदस्थ पातळीवरील भ्रष्टाचारास प्रतिबंध घालण्यासाठी ठोस पावले उचलली.

**पंतप्रधान पं. नेहरु ते पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांच्या कारकीर्दीतील उच्चपदस्थांचा भ्रष्टाचारासंबंधी घेतलेली भूमिका**

**पंतप्रधान पं. नेहरु ते पंतप्रधान लालबहादूर शास्त्री सरकारचा कालखंड-**

भारताचे नव निर्माते म्हणून नेहरुजीनीं केलेले कार्य अतुलनीय आहे. परंतु म. गाधी, डॉ. राधाकृष्णन यांनी अत्यंत पोटतिडकीने भ्रष्टाचाराच्या धोक्यासंबंधी केलेले इशारे नेहरुजींनी मनावर घेतले नाही. त्यांच्या कारकिर्दीत उच्चपदस्थांच्या भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे उघडकीस आली.

काश्मीरमधल्या १९४७ सालच्या भारत-पाकिस्तान चकमकीत भारतीय सैन्यदलाला जीप गाडया हव्या होत्या. यासंबंधी भारताचे लंडनस्थित उच्चायुक्त श्री.व्ही.के.मेनन यांनी जीप गाडयांचे २ व्यवहार केले. व्यवहाराची बोलनी झाल्यानंतर बऱ्याच उशीराने जीप गाडया पाठविण्यात आल्या, त्याही खुप कमी संख्येने व निकृष्ट दर्जाच्या होत्या त्यामुळे संरक्षण खात्याने त्या ताब्यात घेण्यास नकार दिला या जीप खरेद्री घोटयाळाच्या चौकशीकरीता श्री. अनंतशयम अय्यंगार यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली. समितीने प्रतिकुल मत दिले. परंतु सरकारने समितीच्या शिफारशीकडे लक्ष दिले नाही. सार्वजनिक लेखा समितीनेही झालेल्या खरेदी व्यवहारावर आक्षेप घेतला व घोटळयाचा शोध घेण्याकरीता उच्च न्यायालयीन न्यायमूर्तीची समिती नेमण्याची शिफारस केली परंतु पं. नेहरु यांच्या मनात श्री. कृष्णमेनन यांच्या बद्दल खुप आदर होता त्यामुळे कृष्णमेनन आर्थिक गैरव्यवहारात गुंतले असतील हे त्यांना पटले नाही व त्यांनी वरील समितीने वारंवार

केलेल्या शिफारशीकडे दुर्लक्ष करीत ३० सप्टें १९५५ ला जीप खरेदी प्रकरण संपुष्टात आणण्यात आले आहे असे जाहीर केले व नंतर लवकरच कृष्णमेनन नेहरुजींच्या कॅबिनेट मध्ये सामील झाले. पं. नेहरु सरकारच्या काळात मुदंडा प्रकरण खुप गाजले. नेहरुजींचे जावई फिरोज गांधी यांनी उकरुन काढलेल्या मुदंडा प्रकरण मध्ये छागला आयोगाने तत्कालीन अर्थमंत्री टी.टी. कृष्णमाचारी, प्रमुख अर्थ सचीव एच.एम.पटेल यांच्यावर आक्षेप घेतला. पं नेहरुंनी कृष्णमाचारी यांचा बचाव करण्याकरिता थोडाफार प्रयत्न केला परंतु टी.टी कृष्णमाचारी यांनी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा देणे अनिवार्य ठरले.

ओरिसातील खाण - मालकांची पेढी - मेसर्स सेराजुद्दीन अँन्ड कंपनी च्या कार्यालयात आय-कर खात्याने धाडी टाकल्या त्यात जप्त केलेल्या कागदपत्रे व हिशोब वहीत कंपनीने काही केन्द्रीय व राज्य सरकारातील मंत्र्याचे खिसे भरल्याचे दिसुन आले. सेराजुद्दीन प्रकरणात केंद्रीय कॅबीनेटमंत्री के.डी. मालकीय यांना राजीनामा दयावा लागला. मुद्‌गल प्रकरण (१९५१), सायकिल आयात घोटाळा प्रकरण (१९५१), मुंध्रा मैस प्रकरण (१९५८), तेजा ऋण घोटाळा प्रकरण (१९६०) वैगेरे घोटाळयांची प्रकरणे पं. नेहरु सरकारच्या काळात खुप गाजली.

स्वातंत्र्यप्राप्ती च्या दशकाच्या सुरुवाती पासुनच उच्चपदस्थ राजकीय नेत्यांची भ्रष्टाचाराची प्रकरणे चव्हाटयावर येऊ लागली. परंतु आदर्शवादात रमणाऱ्या नेहरुजींच्या कदाचीत लक्षातच आले नाही की वाढता भ्रष्टाचार देशाला पोखरुन टाकेल व बलवान भारत निर्मितीच्या त्यांच्या स्वप्नास तडा पोहोचवेल. व्यक्तिगत पातळीवर नेहरुजी अत्यंत प्रामाणिक, स्वच्छ चारित्र्य असलेले आदर्श व्यक्तिमत्व होते. परतु भ्रष्टाचारा विरोधी त्यांचे धोरण मवाळ स्वरुपाचे होते. नेहरुजींचा भ्रष्टाचाराकडे बघण्याचा दृष्टिकोन त्यांच्या पुढील वक्तव्यावरुन स्पष्ट होते नेहरुजी म्हणतात, ‘ घराच्या गच्चीवर उभे राहुन प्रत्येक जण भ्रष्ट आहे अशी बोंबाबोब करण्यामुळेच भ्रष्टाचाराचे वातावरण निर्माण होते आपण लाचलुच पतीच्या वातावरणतच राहत आहोत असे लोकांना वाटु लागते आणि मग ते भ्रष्ट होतात. रस्त्यावरचा माणूस मग स्वतःशीच म्हणू लागतो अरेच्या सर्व जण लाचखोर आहेत, मग आपण तरी भ्रष्ट का नसावे ? अशी हवा निर्माण होण्याच्या शक्यतेला आपण उत्तेजन देता कामा नये’[३] नेहरुजीच्या या दृष्टीकोनामुळे त्यांनी भ्रष्टाचारासंबंधी कडक उपाययोजना, भ्रष्टाचार रोखण्याकरिता स्वतंत्र यंत्रणा स्थापण केली नाही असे केले असतेतर सुरुवातीलाच भ्रष्टाचाराला आळा घालता आला असता.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या दुसऱ्या दशकापर्यंत राजकीय भ्रष्टाचारानी गंभीर स्वरुप धारण केले होते. १९६१ साली लालबहादुर शास्त्री देशाचे गृहमंत्री झाले. त्यांनी वाढत्या भ्रष्टाचाराची गंभीर दखल घेतली व भ्रष्टाचार रोखण्याचे उपाय सुचविण्याकरीता एक उच्चाधिकारी समिती नेमण्यासाठी नेहरुजीं चे मन वळवीले. १९६२ साली शास्त्रीजीनी खासदार डॉ.के. सथांनम यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. अध्यक्ष - डॉ.के. सथांनम सभासद - संतोष कुमार बसू, टिकाराम पालिवाल, रघुनाथराव खाडिलकर, नाथ पै, शंभुनाथ चतुर्वेदी हे संसद सदस्य व एल.पी.सिंग आय. सी.एस., संचालक, शसकिय दक्षता विभाग व डी.पी. कोहली, एस.पी.ई चे इस्पेक्टर जनरल यांचा समावेश होता. डॉ. सथांनम समितीने भ्रष्टाचाराच्या निराकरणासाठी संस्थात्मक व्यवस्था, आचरणसंहिता, कायदेविषयक तरतुदी आणि भ्रष्टाचाराचा मुकाबला करण्यासाठी संबंधित अन्य विषय यांबाबत सर्वकष शिफारसी सुचविल्या.

समितीच्या शिफारशीची तातडीने दखल घेऊन नव्या व्यवस्था उभ्या केल्या व ठोस कृती करण्यात आली.

१. सेन्ट्रल व्हिजिलन्स कमिटीची (cvc) स्थापना करण्यात आली. केंद्र सरकारच्या सर्व यंत्रणातुन देखरेख करणे व समन्वय साधणे यासाठी ही समिती होती.
२. विद्यमान स्पेशल पोलिस एस्टॅब्लिशमेंटची पुनर्बांधनी करण्यात आली. तिचा विस्तार करण्यात आला व केन्द्रीय अन्वेषण खाते, असे त्याचे नाव ठेवण्यात आले अशाप्रकारे १ एप्रिल १९६३ या दिवशी (सेन्ट्रल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन /CBI) केन्द्रीय गुन्हा अन्वेषण मंडळ ची स्थापना करण्यात आली.
३. मंत्र्यासाठी एक आचरण संहिता बनवली गेली व १८ नोव्हेबर १९६४ ला लोकसभा व राज्यसभा समोर ठेवण्यात आली.
४. सरकारी नोकरांच्या आचरणविषयक नियमांत सुधारणा केल्या गेल्या वरिष्ठाच्या कुठल्याही दबावाखाली न येता, तोंडी हुकुम न मानता परखडपणे सरकारी कर्मचाऱ्यांनी मत मांडावे व निर्णय घ्यावे. संबंधित खात्यांच्या मंत्र्याकडुन होणारा अनावश्यक हस्तक्षेप रोखुन धरण्याच्या दृष्टीने अशी उपाययोजना करण्यात आली.

डॉ. के सन्तानम समितीने १९६५ च्या मार्चपर्यत अंतीम शिफारशी सुचविल्या त्या तात्काळ मान्य करुन, ठोस पावले उचलल्या गेली. नवी यंत्रणा स्थापन करणे, नवीन नियम, कायदे, आचारसहिता तयार करणे अशा उपायातून टप्याटप्याने शास्त्रीजीनीं राजकारण व प्रशासन यांच्या शुध्दिकरणाचे काम जोमाने सुरु केले. लालबहादुर शास्त्रींनी पंतप्रधानाची सुत्रे हाती घेतल्याच्या तीनच दिवसानंतर ११ जुन १९६४ ला न्या.दास अहवाल, जनतेच्या माहितीसाठी प्रसीध्द केला व अहवालानुसार मुख्यमंत्री प्रतापसिंग कैरौं यांना राजीनाम देण्याचा सल्ला दिला. तात्पर्य पंतप्रधान पदाचा कार्यधार सांभळल्या नंतर लगेचच प्राधन्यरुपाने भ्रष्टाचाराच्या प्रकरणासंबधी त्यांनी केलेली कार्यवाही याची दयोतक आहे की ते सरकारची नीतीमत्ता, प्रशासनाची पारदर्शकता या बाबींना अत्यन्त महत्व देत होते. पंतप्रधान पदावर येण्यापूर्वी शास्त्रींजी रेल्वे, दळणवळण, दुरवहन, देशांतर्गत विमानसेवा, वाणिज्य आणि उदयोग अशा अनेक महत्वाच्या खात्याचा पदभार सांभळला होता. ‘हया प्रत्येक खात्यात त्यांनी सर्व अधिकाऱ्यांना एक गोष्ट स्पष्ट केली होती. ती म्हणजे एक वेळ थोडी कार्यशिथिलता ते खपवून घेतील, पण

कुठल्याही परिस्थितीत यत्किंचितही अप्रामाणिकता व भ्रष्टाचार ते सहन करणार नाहीत अशी ताकीद दिली.'[४] असे डॉ. सी.पी. श्रीवास्तव भ्रष्टाचार 'भारताचा अंतस्थ शत्रु' या पुस्तकात लिहीतात. शास्त्रींजी गृहमंत्री व पंतप्रधान असतानां दोन्ही वेळेला त्यांचे गृहसचिव असणरे एल.पी.सिंग लिहीतात - 'सार्वजनिक व्यवहारांत नातीमत्तेचे पालन झालेच पाहिजे या बाण्याने ते काम करत असल्याने त्यांनी त्या दृष्टीने कधीही समझोता केला नाही. प्रत्येक महत्त्वाच्या निर्णय घेताना ती कसोटी अगदी घासुनपूसुन लावली, आपला तो कटाक्ष कायम ठेवून त्या निर्णयाशी ते ठाम राहिले. इतर कोणत्याही पंतप्रधानापेक्षा त्यांना लाभलेले ते वैभवशाली रुप अधिक देखणे होते. सार्वजनिक जीवनात प्रामाणिकतेला सर्व प्रथम प्राधान्य मिळावे म्हणून त्यांनी केलेल्या प्रयासांची सर इतर कोणलाच येणार नाही.'[५] एल.पी.सिंग यांनी असेली लिहिले आहे 'जितक्या पोटतिडकीने, पध्दतशीरपणे आणि कळकळीने लालबहादुर शास्त्रींनी प्रशासनातील भ्रष्टाचार आणि शासनातील अप्रामाणिकपणा या प्रश्नांकडे लक्ष दिले तितके लक्ष त्यांच्या आधिच्या व नंतरच्या कुठल्याही गृहमंत्र्याने वा पंतप्रधनाने दिले नव्हते. सरदार पटेलांनी निश्चितच वज्रमुठीने भ्रष्ट राजकारण्यांचा समाचार घेतला त्यांच्या कडक कारवाईची भीतीच अनितीम ाान राजकारण्यांना प्रतिबंध करणरी ठरली होती. पण देशाच्या फाळणीतुन निर्माण झालेल्या महाकाय समस्या व संस्थानांच्या एकत्रीकरण्याचे प्रश्न यामुळे त्यांना प्रशासनातील व सार्वजनिक जीवनातील सचोटीच्या प्रश्नांची चौकशी व त्याचा निचरा करण्याचा पुरेसा अवधीच मीळाला नाही.'[६] शास्त्रीजीनी उच्च स्तरावरील भ्रष्टाचार मोडून काढला. भष्टाचाराच्या निराकरणासाठी यंत्रणा उभारल्या.राजकारण व प्रशासनसेवेतील भ्रष्टाचारास आळा घालण्यासाठी ठोस भूमिका वठवीली. शास्त्रीजी पंतप्रधान असताना त्यांनी स्वतःच्या खाजगी वापरासाठी एक जीप खरेदी केली होती. त्याच्या कर्जाचे हप्ते ते मरेपर्यंत फेडत होते.

**पंतप्रधान इंदिरा गांधी ते पंतप्रधान राजीव गांधी सरकारचा कालखंड -**

भारताच्या सत्तापटलावर श्रीमती इंदिरा गांधीचा पंतप्रधान म्हणून उदय झाल्याबरोबर नव राजकीय संस्कृतीचा उदय भारतात झ ााला. भ्रष्टाचाराला रोखण्यासाठी संथानम समितीने सुचविलेल्या शिफारशीवर सुरु असलेली कार्यवाही पुढेही चालू ठेवण्याची जबाबदारी निश्चितपणे पंतप्रधान इंदिरा गांधीवर आली होती. परंतु तसे झाले नाही. इदिरा गांधी यांनी एल.एन.मिश्रांची वाणिज्य विभागाचे स्वतंत्र राज्यमंत्री म्हणून नियुक्ती करुन पक्षासाठी निधी गोळा करण्याची जबाबदारी दीली. त्यानीं 'लायसेन्स कोटा परमिट राजचा' पूर्ण वापर केला. १९७१ मध्ये बांगला देशाचे युध्द झाले या युध्दात मिळालेल्या विजयानंतर इंदिरा गांधीनीं लोकप्रियतेचे शिखरच गाठले. त्यानंतर लागलीच मध्यावधी निवडणूक घेण्यात आली. प्रचंड बहुमत इंदिरा गांधीना मीळाले. भारतात मात्र इंदिरा गांधी च्या सर्वकष राजवटीचे पर्व सूरु झाले.

१९७४ मध्ये पॉन्डिचेरी लॉयसेन्स प्रकरण उघडकीस आले. संजय गांधी यांनी गुरगावला टाकलेला मारुती मोटारच्या कारखान्याचा प्रकल्प ही खुप वादग्रस्त ठरला. मारुती कंपनी बनण्याच्या अगोदर एक घोटाळा उघडकीस आला. त्यात पंतप्रधन इंदिरा गांधीचे ही नाव आले की त्यांनी पेसेंजर कार बनविण्यामध्ये लायसन्स देण्यासाठी संजय गांधी यांची मदत केली होती. १९७६ मध्ये तेला च्या किंमती घसरल्यामुळे इंडियन ऑईल कॉरपोरेशन ने हांगकांग मधील एका फर्जी कंपनी सोबत ऑईल डील केली. यात भारत सरकारची १३ करोड रुपयांनी फसवणूक झाली. या घोटाळयात इंदिरा गांधी आणि संजय गांधी चा हात होता असे म्हटल्या गेले. निवडणूक खटल्यात इंदिरा गांधीवर भ्रष्टाचारी मार्गाचा अवलंब केल्याचा आरोप सिध्द झाला. विरोधकांनी त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली पण त्यानंतर पंतप्रधानांनी देशावर अंतर्गत आणीबाणी लादली. आणिबाणीच्या काळातील इंदिरा गांधीनी घेतलेली भूमिका , केलेल्या कारवाया वादग्रस्त ठरल्या. त्यांच्यावर होणाऱ्या भ्रष्टाचाराच्या आरोपांची त्यांनी दखलच घेतली नाही. 'भ्रष्टाचार ही एक जागतिक घटना आहे. 'असे सांगून विरोधकांच्या टिकेला त्यांनी उडवुन लावले. सुरभि बॅनर्जीलिखित Jyoti Basu - An Authorised Biography या चरित्रग्रंथात ज्योती बसु नी सांगीतले, 'भारतीय राजकारणातील साप्रंतचा नैतिक मुदयाचा ऱ्हास इंदिरा गांधीच्या कारकीर्दीपासुन सुरु झाला. '[७]

१९७७ ते १९७९ पर्यंत पंतप्रधान मोरारजी देसाईंच्या नेतृत्वाने जनतापक्ष सत्तेवर आले सरकारने न्या. एस.सी शहा यांच्या अध्यक्षतेखली आणिबाणीत सरकारी व इतर यंत्रणाकडून झालेल्या अतिरेकी कारवायाची चौकशी करण्यासाठी आयोगाची नियुक्ती केली. पोलीसखात्यातील सुधारणासंबंधी शीफारशी सुचविण्याकरीता श्री. धर्मवीर यांच्या अध्यक्षतेखली उच्चाधिकार आयोग नेमण्यात आले. दोन्ही आयोगाने आपले कार्य चोखपणे केले १९८० ला परत इंदिरा गांधी यांनी लोकसभेच्या निवडणूकीत बहुमत मीळवून सरकार स्थापन केले. ३१ ऑक्टो १९८४ ला इंदिरा गांधीच्या सुरक्षा रक्षकांनीच त्यांची गोळया घालुन हत्या केली. त्यांनतर १९८४ मध्ये राजीव गांधी पंतप्रधान झाले त्यांच्या काळात झालेल्या बोफोर्स घोटाळयात पंतप्रधान राजींव गांधी वर दोषारोपन झाले. सैन्यदलासाठी बोफोर्स तोफाच्या खेरेदी व्यवहारात प्रचंड पैशाची लाच दलालाना देण्यात आल्याचे १६ एप्रिल १९८७ ला स्विडिश रेडिओवरुन सांगण्यात आले. बोफोर्स घोटाळा ६४ करोड रुपयाचा होतो. या घोटाळयामुळे १९८८-८९ मध्ये राजीव गांधीना सत्तेवरुन पायउतार व्हावे लागले.

**पंतप्रधान व्ही.पी.सिंग ते पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग सरकारचा कालखंड -**

राजीव गांधी नंतर व्ही.पी.सिंग, चंद्रशेखर, पी.व्ही.नरसिंहराव, एच.डी. देवेगौडा. आय के. गुजराल, अटलबिहारी वाजपेची व विदयमान डॉ. मनमोहन सिंग हे भारताचे पंतप्रधान झाले. देशात युती ची सरकारे किंवा बाहेरुन पाठींबा मिळवून सरकार स्थापण्याचे युग सुरु झ

ाले. व्ही.पी. सिंग, चंद्रशेखर, एच.डी.देवेगौडा, आणि आय.के. गुजराल हे युती चे व बाहेरुन समर्थन देणाऱ्याच्या राजकारणा मुळे एक वर्षाचीही कारकीर्द पूर्ण करु शकले नाही. त्यामुळे भ्रष्टाचाराला आळा घालण्याकरीता महत्वाची भूमिका वठवू शकले नाही. आय.के. गुजराल यांनी वेळोवेळी भ्रष्टाचारासंबंधी काळजी व्यक्त केली परंतु 'भ्रष्टाचाराची पाळेमुळे खणून काढण्यासाठी माझ्यापाशी एखादी जादुची कांडी नाही' असे होम टी.व्ही. या दुरदर्शन चॅनेलवरील मुलाखतीत सागुंन भ्रष्टाचार आटोक्यात आणण्यासंबंधीची असमर्थता दर्शवली.

पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव यांनी मात्र ५ वर्षांची कारकीर्द पूर्ण केली. परंतु त्यांच्याकाळात मंत्री, कॅबीनेट मंत्री व स्वत: नरसिंहराव भ्रष्टाचारात गुंतल्याची प्रकरणे उघडकीस आली. उच्च पातळया वरील भ्रष्टाचारी प्रकरणाच्या तपासकामात उघडउघड हस्तक्षेप करण्याचा ठपका नरसिंहराव याच्यांवर ठेवण्यात आला. त्यांच्या काळात हर्षद मेहता प्रणीत घोटाळा, युरिया घोटाळा, चारा घोटाळा, साखर घोटाळा असे अनेकानेक घोटाळे उघडकीस आले. झारखंड मुक्ति मोर्चा लाच प्रकरणामुळे पी.व्ही नरसिंहराव अडचणीत आले. अल्पमतातील सरकार वाचविण्यासाठी संसद सदस्यांचा पाठींबा मिळावा म्हणून लाच दिल्या गेली असा आरोप त्यांच्यावर झाला. ३० ऑक्टोबर १९९६ ला CBI ने या प्रकरणाची चौकशी करुन फौजदारी खटला दाखल केला. त्यात पंतप्रधान नरसिंहरावा सहित बुटासिंग, कॅ. सतीश शर्मा, अजीतसिंग हे माजी केन्द्रीय मंत्री, खासदार व हरयानाचे माजी मुख्यमंत्री भजनलाल व इतर काही जनांचा समावेश होता. १९९६ च्या हवाला प्रकरणात भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष, माजी उपपंतप्रधान राहीलेले लालकृष्ण अडवानी यांच्या सह काही केंदीय मंत्र्यावर आरोप ठेवण्यात आले. परंतु पुरावा न मिळाल्यामुळे ते निर्दोष सुटले.

१९९६ मध्ये CBI ने नरसिंहराव सरकारमध्ये टेलीकॉम मंत्री राहिलेल्या सुखराम यांच्या सरकारी निवासावरील छाप्यात ३.६ कोटी रु हस्तगत केले होते. दिल्लीच्या न्यायालयाने त्यांना २००२ मध्ये ३ वर्षाची शिक्षा ठोठावली. १८नोव्हे २०११ ला सुप्रीम कोर्टाने त्यांची शिक्षा वाढवून ५ वर्ष केली. वर्ष २०१२ मध्ये त्यांचा जामीन मंजुर झाला.

भारतीय जनता पक्षाचे माजी अध्यक्ष व वाजपेयी मंत्रीमंडळात केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री असलेले बंगारु लक्ष्मण यांना लाच घेतल्याबददल सीबीआय च्या विशेष न्यायालयाने दोषी ठरविले. डिसेंबर २००० ते जानेवारी २००१ या काळात बंगारु लक्ष्मण यांनी तथकथित शस्त्रास्त्र दलालांशी आठ वेळा चर्चा केल्याचे स्पष्ट झाले. तेहलकाने स्टिंग ऑपरेशन करुन बंगारु लक्ष्मण लाच घेत असल्याचे चित्रण देशवासीयांना दाखिवले होते. बंगारु लक्ष्मण यांना भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदया अंतर्गत तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली. २ जी स्पेक्ट्रम घोटाळयात दोषी असलेले माजी केन्द्रीय दुरसंचार मंत्री ए.राजा यांना २० फेब्रुवारी २०११ मध्ये तुरुंगवासाची शिक्षा सुनावली. ए.राजा यांनी सन २००८ मध्ये १२२ कंपन्याना परवाने दिले होते. त्यात सरकारला १,७६,३७९ कोटी रुपायाचे नुकसान झाले. हा व्यवहार करताना ए. राजा यांनी कायदा मंत्रालयाबरोबरच, पंतप्रधान कार्यालयाचा सल्ला धुडकावला असा ठपका कॅग ने त्यांच्यावर केला. या प्रकराणासंबंधी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांच्या भूमिकेविषयी सर्वाच्च न्यायालयाने काही सवाल केले. या घोटाळया प्रकरणात ए. राजा यांच्यावर खटला चालविण्याची परवानगी दयायला पंतप्रधानांनी उशीर का लावला ? असा प्रश्न सर्वाच्च न्यायालयाने सॉलिसिटर जनरल गोपाल सुब्रमण्यम स्वामी यांना विचारला. २९ नोव्हें २००८ रोजी पंतप्रधन कार्यालयात परवानगी साठी पत्र पाठविण्यात आले होते. २९ नोव्हे २००८ ते २९ ऑक्टो २००९ या कालावधीत काय घडले ? सर्वाच्च पदावर असलेली व्यक्ती एखादया तक्रारीकडे दुर्लक्ष करु शकते का ? अशी ही विचारणा न्यायालयाने केली. डी एम के प्रमुख करुना निधी यांची कन्या खासदार कनीमोझीलाही २ जी घोटाळयातच तिहारजेलमध्ये जावे लागले सध्या जामीनावर त्या बाहेर आहेत.

राष्ट्रकुल स्पर्धेतील घोटाळाही बराच गाजला. निरनिराळया स्टेडियमच्या व व्यवस्थेच्या नूतनीकरणासाठी रु ४४,४५९ कोटी खर्च करण्यात आले. या घोटाळयात अडकलेले पुण्याचे खासदार सुरेश कलमाडी यांना २५ एप्रिल २०११ ला अटक करुन तिहार जेलमध्ये ठेवण्यात आले. ९ महिन्यानंतर त्यांना जामीन मिळाला.

१९९६ मध्ये ९५० करोड रुपयाचा चारा घोटाळा प्रकरण अवतरले. चारा घोटाळा प्रकरणी माजी रेल्वेमंत्री आणि बिहारचे माजी मुख्यमंत्री लालुप्रसाद यादव यांच्यासह जगदीश शर्मा आणि रशीद मसूद हयांना न्यायालयाने दोषी ठरवून शिक्षा ठोठावली. सध्याच कोंळसा खाण वाटप प्रकरण उघडकिस आले त्यात खुद्द पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांच्यावर दोषारोपन झाले. कॅग ने कोळसा खाण वाटपात १९२ लाख कोटी रुपये महसुल तोटा सरकारला झाला असे सागीतले. पंतप्रधान कार्यालया अंतर्गत कोळसा मंत्रालय होते म्हणुन पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांना जबाबदार धरण्यात आले.

**निष्कर्ष व शिफारशी**

भारत महासत्ता बनण्याचा मार्गावर आहे अशी चर्चा अधुनमधुन होत असते दारिद्रय, कुपोषण, महागाई, बेकारी अशा महाकाय समस्या चे आव्हान भारतासमोर असतांना महासत्ता बनने हे दीवास्वप्न आहे असे म्हणावे लागेल. भारताचे २८० लाख करोड रुपये रिझर्व बँकेत जमा आहे असे स्विस बँकेच्या डायरेक्टरने सागितले. ही रक्कम एवढी मोठी आहे की भारतात येणारे ३० वर्षाचे बजेट बीना टक्स चे बनू शकेल. एकीकडे अंधाधुंद पैशाची लुट चालु आहे तर एकीकडे देशातील ५० टक्के लोक अत्यंत दारिद्रयाचे जीवन कंठीत आहे. २० रुपये उत्पन्न मिळवू न शकणारी कोटयावधी कुटुंब भारतात आहे. या समस्यांचे कारणे अनेक असली तरीही या सर्व समस्यांचे मूळ सर्वव्यापी प्रचंड भ्रष्टाचारा त आहे. मुख्यत्वे याला जबाबदार आहे प्रशासन व राजकारणातील उच्च पदस्थांचा भ्रष्टाचार.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात भ्रष्टाचाराच्या प्रकरणाची अखंड मालीका दिसून येते. ही परिस्थिती मन उद्विग्न करणारी आहे. सरकार व प्रशासन यांनी नीतीमता जोपासणे अनिवार्य आहे. रक्षकच भक्षक होऊन कसे चालेल ? अत्यंत आपुलकीने विश्वासाने देशाच्या कल्याणाची जबाबदारी जनता जनार्दन राजकर्त्यांवर सोपविते. या विश्वासाची कदर राज्यकर्ते करणार का ?

भ्रष्टाचार भावी नवभारताच्या राष्ट्रबांधनीसाठी घातक ठरेल. देशाच्या प्रगतीला धोका पोहचवेल याची कल्पना म.गांधी व डॉ.राधाकृष्णन यांना होती. म्हणून सार्वजनिक जीवनातील प्रामाणिकतेला सर्वाच्य प्राधान्य व नीतीमान राजकारणाची गरज त्यांनी बोलवून दाखविली. भ्रष्टाचाररहित, स्वच्छ व प्रामाणिक प्रशासन व राजकारण निर्माण करण्याची जबाबदारी नवनिर्वाचीत व येणाऱ्या सर्व सरकारांवर होती परंतु खेदाने म्हणावे लागेल की राज्यकर्त्यांनी भ्रष्टाचाराच्या धोक्याला मनावर घेतले नाही, स्वच्छ व प्रामाणिक राजकारण व प्रशासन निर्मितीला प्राथमिकता दिली नाही. लागोपाठ येणाऱ्या सरकारांची भ्रष्टाचाराकडे डोळेझाक करण्याच्या वृत्तीमुळे भ्रष्टाचाराला वाव मिळत गेला, तो पोसला गेला व भारतात सर्वत्र पसरला.

शास्त्रीजीनीं भ्रष्टाचारास आळा घालण्यासाठी अत्यंत दक्षतापूर्वक पावले उचलली परंतु त्यांनतरच्या सरकारने त्याचा पाठपुरावा केला नाही. शास्त्रीजीनीं भ्रष्टाचारास प्रतिबंध घालण्यासाठी ज्या संस्था स्थापन केल्या, उपाय केले ते आजही उपयोगी पडत आहे. जगात ज्या देशाने भ्रष्टाचारमुक्त वातावरण आपल्या देशात निर्माण करण्यात बऱ्याच प्रमाणत यश मिळविले त्याचा अभ्यास करुन व त्याची चर्चा देशपातळीवर घडवून आणावयास हवी. न्युझीलंड, डेन्मार्क, फिनलँड, स्विडन, सिंगापुर, तुर्कस्तान, हे देश बऱ्याच प्रमानात भ्रष्टाचार मुक्त वातावरन निर्माण करण्यात सफल झाली. भ्रष्टाचार मुक्त वातावरन निर्माण करण्यात प्रसार माध्यमांची सकारात्मक भुमिका महत्वाची ठरु शकते. समाज सेवक अण्णा हजारे यांनी स्वच्छ, पारदर्शक प्रशासन निर्मितीसाठी जोरदार लढा देऊन जनचळवळ उभारली व सुशासनाच्या निर्मितीकरीता जनतेला माहितीच्या अधिकाराचे शस्त्र मिळवुन दिले. नागरिंकानी या शस्त्राच्या योग्य रितीने वापर करुन स्वच्छ प्रशासन निर्मितीसाठी सदैव जागरुक असले पाहिजे.

भ्रष्टाचार व गुन्हेगारी यात दोषी ठरलेल्यांचे संसद सदस्यत्व नष्ट करण्याचा सर्वाच न्यायालयानीं दिलेला निर्णय भ्रष्ट, अनीतिमान राजकारण्यावर जरब बसवेल असे वाटते. सार्वत्रीक निवडणूका पारदर्शक करण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. निवडणूकीसाठी उमेदवाराना प्रचंड रक्कम खर्च करावी लागते. निवडणूकीसाठी आर्थिक सहाय्य करणाऱ्याचें हितसंबंध जोपासताना मोठया प्रमाणत भ्रष्टाचार घडून येतो. प्रामाणिकपणे निवडणूका लढविल्या जाऊशकतात व जिंकल्या जाऊशकतात हे दिल्ली विधानसभेतील निवडणुका मधील अरंविद केजरीवाल यांच्या यशाने दाखवून दिले आहे. हा विजय भ्रष्ट व्यवस्था मोंडून काढणारी क्रांती आहे. ही परिवर्तनाची नांदी आहे. राजकारण्यांनी यापासून बोध घ्यावा. अण्णा हजारे यांनी भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी लोकपाल यंत्रणा उभारण्याकरीता मोठया प्रमाणात जनआंदोलन केले. याची फलश्रुती म्हणून लोकपाल विधेयक लोकसभा व राज्यसभेत संमत झाले. भ्रष्टाचार विरोधात संस्थात्मक यंत्रणा निर्मीतीची वाट मोकळी झाली .

भ्रष्टाचाराविरोधी लढयात लोकसहभाग असणे आवश्यक आहे. दक्ष, जागरुक, सक्रीय नागरिकच सरकार व प्रशासनातील भ्रष्टाचाराला नियंत्रीत करु शकतात व भ्रष्टाचार निर्मुलनाला प्राधान्य देणाऱ्या सरकारची नियुक्ती करु शकतात. आज गरज आहे देशाला घटनात्मक नीतीमत्तेचे पालन करणाऱ्या शासकर्त्यांची. परंतु नीतीमत्ता शासन दरबारी प्रमाणेच जनदरबारी असणे ही आवश्यक आहे तेव्हाच नैतिक मुल्य संपन्नतेचा संस्कार देशात होईल. हा संस्कार पोसने व त्यांचे संवर्धन करणे ही जबाबदारी एक राष्ट्र म्हणून आम्हां सर्वांची आहे.

**संदर्भ ग्रंथ सुची :-**

१. भारतीय राजकारणातील गुन्हेगारी व भ्रष्टाचार - निर्मल कुमार सिंग अनुवाद माधव मोर्डेकर १ (पृ. १२०), २(पृ. ५), ५ (पृ. १२६), ७ (पृ. १९)
२. भ्रष्टाचार भारताचा अंतस्थ शत्रु - डॉ.सी.पी.श्रीवास्तव अनुवाद - डॉ. वसंत पटवर्धन ३(पृ. ६१), ४(पृ. ६७), ६ (पृ. ६६)
३. प्रशासनाचे पैलू - खंड १ व खंड २ - माधव गोडबोले
४. वृत्तपत्र
लोकमत - २६ ऑक्टों २०१३, २९ एप्रिल २०१२, २८ एप्रिल २०१२, १७ नोव्हे २०१०, १६ डिसें २०१०, २० नोव्हे २०१०
हितवाद - ०२ जुन २०१३, २४ नोव्हे २०१३
५. इंडिया टूडे - ०६ मार्च २०१३.
६. http://bharatkalyan९७.blogspot.in/२०१३/०४/india-corruption-score-since-१९४८.html
७. http://en.wikipedia.org/wiki/list_of_scandais_india#१९४०s